पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक - **२३/०६/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२३/०६/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.मंगला अशोक कदम
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.कदम – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.०४) मनपाची सुदर्शननगर महिला हेल्थ क्लब ही व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत - मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०५) महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेबाबत - मा.राजेंद्र गावडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०६) महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्ठव स्पर्धा २०१७ आयोजित करणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०७) शालेय जिल्हास्तर (कबड्डी) क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०८) मनपाची मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा, तालेरानगर, चिंचवडगाव चालविण्यास देणेबाबत - मा.राजेंद्र गावडे मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०९) मनपाची राजमाता जिजाऊ व्यायामशाळा, काकडेपार्क, चिंचवडगाव चालविण्यास देणेबाबत - मा.राजेंद्र गावडे मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) बाबाजी पांडू भांडे व्यायाम शाळेकरिता माती, खाद्य देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत - मा.अंबरनाथ कांबळे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

-----------

दिनांक **०९/०६/२०१७** रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्र.५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २३/०६/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३५९/२०१७, दि.०३/०६/२०१७

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस चिंचवड पुणे १९ यांना, कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफ सफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाचे ई-निविदा नोटीस क्र.१/२०१३-२०१४ पहिल्या वर्षाचे मंजूर दरानुसार म्हणजेच दरमहा र.रु.९७,०२०/- या दराने, संभाजीनगर जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफ सफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज, दि.८/४/२०१७ पासून ई निविदा नोटीस प्रक्रिया होई पर्यंत, करारनामा करून, कामकाज आदेश दिलेला असल्याने सदरचा विषय मा.स्थायी समिती सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २३/०६/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा. अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३५८/२०१७, दि.०३/०६/२०१७

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.सुमित स्पोर्टस अँड फिटनेस इक्विपमेंट चिंचवड पुणे १९ यांना, कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफ सफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाचे ई-निविदा नोटीस क्र.१/२०१३-२०१४ मंजूर दरानुसार म्हणजेच दरमहा र.रु.९७,०२०/- या दराने, पिंपरी वाघेरे जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफ सफाई देखभाल व

यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज, दि.१०/४/२०१७ पासून ई निविदा नोटीस प्रक्रिया होई पर्यंत, करारनामा करून, कामकाज आदेश दिलेला असल्याने सदरचा विषय मा.स्थायी समिती सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २३/०६/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा. अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३६०/२०१७, दि.०३/०६/२०१७

मा. अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

म.न.पा.च्या नेहरूनगर, चिंचवड, कासारवाडी, यमुनानगर, निगडी, सांगवी, मा.आयुक्त निवास, पिंपळेगुरव एकूण ८ जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाची मुदत संपल्याने, सध्या उन्हाळी सिझन असल्याने, ई निविदा नोटीस कार्यवाही चालू असल्याने, प्रस्तावातील तक्त्यात नमूद कलेप्रमाणे, सध्याचे चालू दराने, तलावाचे नावापुढे रकाना क्र. ७ मध्ये नमूद केलेचे तारखेपासून दि.३१/०८/२०१७ पर्यंत यापूर्वी केलेल्या करार नाम्यातील अटी व शर्तीनुसार, सदर कामकाजास मुदत वाढवून देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

मनपाची सुदर्शननगर महिला हेल्थ क्लब सुदर्शननगर चिंचवड पुणे ४११ ०३३ ही व्यायामशाळा श्रीधरनगर युवा प्रतिष्ठान, श्रीधरनगर, चिंचवड पुणे ४११ ०३३ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची सुदर्शननगर महिला हेल्थ क्लब सुदर्शननगर चिंचवड पुणे ४११ ०३३ ही व्यायामशाळा श्रीधरनगर युवा प्रतिष्ठान, श्रीधरनगर, चिंचवड पुणे ४११ ०३३ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि. २९ ते ३१ जूलै २०१७ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१७-१८ (पुरुष गट, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/- (अक्षरी र.रु.तीन लाख, ब्याऐंशी हजार, नऊशे साठ फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेस, सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरित र.रु.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर्स, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार, इ.निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने तसेच पिंपरी चिंचवड शरीरसौष्ठव संघटना यांच्या मान्यतेने प्रभाग क्र.२७ श्रीनगर, रहाटणी येथे महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्ठव स्पर्धा २०१७ आयोजित करणेस व सदर स्पर्धेचे नियोजन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक - ०७

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजू बनसोडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील पुणे जिल्हा क्रीडा परिषद व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय कबड्डी

स्पर्धांचे आयोजन वयोगट १४, १७, व १९ (मुले / मुली) महेशदादा स्पोर्टस् फाऊंडेशन लांडगे आळी भोसरी येथे आयोजित करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक - ०८

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

मनपाची वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा, तालेरानगर, चिंचवड पुणे ४११ ०३३ ही व्यायामशाळा भक्तीशक्ती प्रतिष्ठान, चिंचवडगाव, पुणे ४११ ०३३ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा, तालेरानगर, चिंचवड पुणे ४११ ०३३ ही व्यायामशाळा भक्तीशक्ती प्रतिष्ठान, चिंचवडगाव, पुणे ४११ ०३३ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक - ०९

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

मनपाची राजमाता जिजाऊ व्यायामशाळा, काकडेपार्क, चिंचवडगाव, पुणे ४११ ०३३ ही व्यायामशाळा काकडेपार्क मित्रमंडळ, चिंचवडगाव, पुणे ४११ ०३३ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची राजमाता जिजाऊ व्यायामशाळा, काकडेपार्क, चिंचवड पुणे ४११ ०३३ ही व्यायामशाळा काकडेपार्क मित्रमंडळ, चिंचवडगाव, पुणे ४११ ०३३ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक - १०

दिनांक - २३/०६/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

मनपाची बाबाजी पांडू भांडे व्यायामशाळेकरिता माती, खाद्य, तेल, दही, लिंबू इ. खाद्य मनपाकडून खरेदी करुन देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९१५/२०१७
दिनांक : २३/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc